# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,हिंगोली

(गृह विभाग, कायदा व सुव्यवस्था)

E-mail ID :- rdc.hingoli123@gmail.com

दुरध्वनी-02456 221450

जा.क्र.2020/गो.शा.1/करोना/कावी – 133

दिनांक 17/05/2020.

संदर्भ : 1. या कार्यालयाचे पत्र जा.क्र. 2020/डिसी-3/कावी- दिनांक 13.04.2020

2. या कार्यालयाचे पत्र जा. क्र. 2020/गो.शा.1/करोना/कावी दिनांक 19/04/2020.

3.महाराष्ट्र शासन अधिसुचना दिनांक 17/04/2020.

## आदेश

ज्याअर्थी, जागतिक आरोग्य संघटनेने करोना (कोव्हीड-19) या विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणुन घोषीत केलेला आहे. तसेच कोरोना विषाणुचा प्रसार भारतात,महाराष्ट्रातील शहरात गतीने पसरत आहे असे दिसुन येत आहे. तसेच राज्य शासनाने करोना विषाणुचा प्रादुर्भाव रोकण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दिनांक 13 मार्च 2020 कायदयातील खंड 2,3 व 4 मधील तरतुदी नुसार अधिसुचना निर्गमीत केलेली आहे. त्याबाबतची नियमावली तयार करण्यात आलेली आहे. तसेच भारत सरकार आरोग्य मंत्रालय महाराष्ट्र शासन आरोग्य मंत्रालय यांनी जाहीर केल्याप्रमाणे करोनाग्रस्त रुग्णाचे इतर लोकांनी संपर्कात येऊ नये तसेच सार्वजनिक किंवा खाजगी ठिकाणी एकत्र येणे, थांबणे, चर्चा करणे इत्यादी बाबीमुळे या विषाणुचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता सर्व सामान्य जनतेस व त्यांच्या आरोग्यास धोका होऊ नये या करीता फौजदारी दंड प्रक्रीया संहिता 1973 चे कलम 144 अन्वये मनाई आदेश देण्यात आले आहे. तसेच संदर्भ 1 व 2 च्या आदेशाद्वारे सदरील कालावधीमध्ये बँकाचे व्यवहार सुरु ठेवण्याकरीता परवानगी देण्यात आली आहे. संदर्भ क्र. 3 च्या अधिसुचनेत आर्थीक क्षेत्राबाबत मार्गदर्शन सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

**त्याअर्थी, सर्व बँकामध्ये कामकाज हे RBI ने निश्चित केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे सुरु राहील. खातेदारासाठी सकाळी 10.00 ते दुपारी 3.00 वाजेपर्यत खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन आर्थीक व्यवहार करता येतील.**

1. संबधीतांनी दिनांक 18/05/2020 पासुन कामाची सुरुवात करताना संपुर्ण जागेचे सेनिटायझेशन करुनच सुरुवात करावी.
2. गर्दी टाळण्यासाठी एक ते दोन मिटर अंतरावर गोल /चौकोन आखण्यात यावेत.
3. खातेदार आखलेल्या गोल / चौकोना मध्येच उभे राहतील याचे नियोजन करावे.
4. खातेदाराना टोकन देण्यात यावेत, व टोकन नुसारच व्यवहार करावेत.
5. टोकननुसार नंबर आलेचे खातेदारांना माहिती होण्याकरीता Public announcement System बसविण्यात यावी.
6. उन्हाळयाचे दिवस असल्यामुळे रिकामे जागेत मंडप /शामीयाना उभारण्यात यावा व तिथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी.
7. खातेदार ,सुरक्षा रक्षक,बँक कर्मचारी व अधिकारी यांचे सुरक्षेसाठी मास्क व सॅनीटायझराचा वापर करणे बाबत सर्व संबंधितांना सांगावे व त्याचे पालन होईल यांची दक्षता घ्यावी.
8. एकाच वेळी बँकेमध्ये 5 पेक्षा जास्त व्यक्तीस प्रवेश देऊ नये.
9. दररोज कामावर येणा-या अधिकारी /कर्मचा-याची तसेच खातेदाराची तपासणी थर्मल गन च्या सहाय्याने करण्यात यावी.
10. परिसरामध्ये पिण्याच्या पाण्याची व हात धुण्याची व्यवस्था व साबण याची व्यवस्था करण्यात यावी व पाणी उपलब्ध राहील यांची दक्षता घेण्यात यावी.

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,हिंगोली

(गृह विभाग, कायदा व सुव्यवस्था)

E-mail ID :- rdc.hingoli123@gmail.com दुरध्वनी-02456 221450


11. शासनाने ठरवुन दिलेल्या अंतराच्या परीसीमाचे तंतोतंत पालन करुन बँकेमध्ये व बँकेच्या परीसरामध्ये **सामाजीक अंतराचे (Social Distance)** पालन करण्यात यावे व जागोजागी सुरक्षीततेच्या उपाययोजनांचे माहिती फलक लावण्यात यावेत.

या आदेशाद्वारे विहित करण्यात आलेल्या कोणत्याही निर्बंधाची किंवा काढलेला आदेशाची अवज्ञा करणा-या कोणत्याही व्यक्तीने भारतीय दंड संहिता (1860 चा 45) यांच्या कलम 188 अन्वये शिक्षा पात्र असलेल्या अपराध केला आहे असे मानन्यात येईल.

सदर आदेश आज दिनांक 17/05/2020 रोजी माझ्या स्वाक्षरी व शिक्या निशी निर्गमित करण्यात येत आहे.

स्वाक्षरीत/-

(रुचेश जयवंशी ) भा.प्र.से.

जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण हिंगोली.

<u>प्रतिलिपी : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव</u>.

1. मा. प्रधान सचिव, म.शा. सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांना माहितीस्तव.
2. मा. विभागीय आयुक्त, औरगाबाद यांना माहितीस्तव.
3. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. हिंगोली.
4. पोलीस अधिक्षक, हिंगोली यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्त.
5. उपविभागीय दंडाधिकारी, हिंगोली/कळमनुरी/वसमत/औंढा /सेनगांव.
6. तालुका कार्यकारी दंडाधिकारी हिंगोली/कळमनुरी/वसमत/औंढा /सेनगांव
7. सव मुख्याधिकारी, नगरपालीका/नगरपंचायत जि. हिंगोली.
8. जिल्हा माहिती अधिकारी, हिंगोली.
9. व्यवस्थापक जिल्हा अग्रेणी बँक जि. हिंगोली यांना अनुपालनास्तव.
10. पोस्ट मास्टर पो.ऑफीस जि. हिंगोली यांना अनुपालनास्तव.

(रुचेश जयवंशी ) भा.प्र.से.

जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण हिंगोली.

Scanned by CamScanner